## मुप्टा- संपर्क कार्यालयचे उद्घाटन



बीड : मुप्टा– शिक्षक संघटनेचे दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी प्रा सुनील भाऊ मगरे सर यांच्या हस्ते तर शरद मगर बीड जिल्हाध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

# व्हिडिओ प्रसारित करत पंकजाताईंची बदनामी करणाऱ्या माऊली इंगळेवर कारवाई करा

## भाजपचे केज तालुकाध्यक्ष भगवान केदार यांची केजच्या पोलीस प्रशासनाकडे मागणी

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील कळंबअंबा गावच्या माजी उपसरपंच यांचे पती ज्ञानेश्वर उर्फ माऊली इंगळे यांनी बुधवारी (दि.१) बीडचे पोलीस अधीक्षक कार्यालय गाठले. त्यांनी स्वतःचे अपहरण झाले असून आपण अपहरणकर्त्यांच्या तावडीतून पलायन करून पोलिसांकडे तक्रारीसाठी आलो आहे, असे सांगत प्रसारित केलेल्या एका व्हिडिओमध्ये राज्याच्या पर्यावरण व हवामान बदल, पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचा जाणीवपूर्वक उल्लेख करून बदनामी केली आहे, याबाबत पोलीस प्रशासनाने कार्यवाही करावी. याबाबत आपण केज पोलिसांकडे तक्रार करून सखोल चौकशी करण्याची मागणी करणार असल्याचे भाजपचे तालुकाध्यक्ष भगवान केदार यांनी सांगितले आहे.



कळंबअंबा गावच्या माजी उपसरपंच यांचे पती ज्ञानेश्वर उर्फ माऊली इंगळे यांनी कोरेगावचे माजी सरपंच दत्ता तांदळे यांच्यासह सहकाऱ्यांनी अपहरण केल्याचा दावा केला आहे. त्या अपहरणकर्त्यांच्या ताब्यातून पलायन करून आपण थेट एसपी ऑफिसमध्ये आलो आहे, अशी सर्व माहिती ज्ञानेश्वर उर्फ माऊली इंगळे यांनी एका व्हिडिओद्वारे दिली. त्या व्हिडिओमध्ये त्यांनी सुरुवातीस म्हटले की, मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्याकडून निधी आणण्यासाठी जायचे असून टक्केवारीचे पैसे घेऊन ये, मुंबईला सोबत जाऊ, असे दत्ता तांदळे यांनी सांगितले. त्यानुसार श्री.इंगळे हे २ लाख रुपये घेऊन त्यांच्यासमवेत निघाले असता, पाटोदा तालुक्यात एका ठिकाणी घरामध्ये डांबून ठेवले, तिथे मारहाण केल्याचा आरोप केला आहे. त्या ठिकाणाहून आपण स्वतःची सुटका करून घेत पलायन केल्याचे इंगळे यांनी म्हटले आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करणे गरजेचे आहे. कारण, इंगळे व तांदळे हे दोघे केज तालुक्यातील तालुकास्तरावरील कार्यकर्ते/नेते आहेत. या दोघांवर काही गुन्हे देखील दाखल आहेत, हे दोघेही मनसे पक्षाचे माजी पदाधिकारी आहेत. या दोघांची मैत्री देखील असल्याचे तालुक्यात सर्वश्रुत आहे.

## पारदर्शक व गुणवत्तापूर्ण करावी: ग्राम विकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामात पारदर्शक व गुणवत्तापूर्ण कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

मंत्रालयात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तसेच कंत्राटी कामगार वेतन थकबाकीबाबत आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सचिव सतिश चिखलीकर, वित्तीय नियंत्रक अभय धांडे, उपसचिव प्रशांत पाटील, कार्यासन अधिकारी विवेक शिंदे, अच्युत इप्पर, विजय चौधरी उपस्थित होते. ग्रामविकास व पंचायतराज मंत्री श्री. गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निकषात बदल करण्यासाठी केंद्र सरकारसोबत चर्चा करण्यात येईल, जेणेकरुन कामात सुलभता निर्माण होईल. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

## ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आनंदी व उत्साही वातावरणामध्ये केले नववर्षाचे स्वागत

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

ज्ञानदीप प्राथमिक विद्यालया व बालसंस्कार केंद्रातील विद्यार्थ्यांनी अतिशय आनंददायी व उत्साहवर्धक वातावरणामध्ये नववर्षाचे स्वागत केले

यावेळी विद्यालयातील १ ली ते ७ वी पर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांनी एकत्रित येत WEL COME २०२५ हे नाव अतिशय सुंदररित्या तयार केले. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक शेख शाहीद , मुंजाराम निरडे व रामराजा दराडे यांच्या पुढाकारातून व विद्यालयातील बालसंस्कार केंद्रातील सर्व शिक्षकवृंद यांच्या परीश्रमातुन उत्साहात नव्या वर्षाचे स्वागत करण्यात आले. बालसंस्कार वर्गातील बाल विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट शुभेच्छा कार्ड तयार करून उत्साहात नविन वर्षाचे स्वागत केले



## माजी आ. प्रदीप नाईक यांना उपमुख्यमंत्री पवार यांची श्रद्धांजली

**मुंबई । प्रतिनिधी**

किनवटचे माजी आमदार प्रदीप नाईक यांच्या निधनाने धडाडीचा लोकप्रतिनिधी, कर्तव्यनिष्ठ लोकसेवक हरपला आहे. त्यांच्या निधनाने किनवटच्या सामाजिक जीवनाशी घट्ट नाळ जुळलेले व्यक्तिमत्त्व हरपले आहे. किनवट विधानसभा मतदारसंघाच्या विकासात त्यांनी दिलेले योगदान कायम स्मरणात राहील. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करुन श्रद्धांजली वाहिली.


## चंपावती अर्बन को-ऑप बँक लि. बीड (अवसायनात) जुना मोंढा, बीड

**जाहीर प्रगटन** दिनांक: ३१/१२/२०२४

चंपावती अर्बन को ऑफ बँक जि. बीड या बँकेने खालील व्यक्तीला कर्ज वाटप केलेले आहे. सदर कर्ज थकीत झाल्यामुळे त्यांची स्थावर/जंगम मालमत्ता जप्त करून वसुली करण्यासाठी महाराष्ट्र सहसंस्था अधिनियम १९६० चे कलम १०५ अन्वये कार्यवाही करण्यासाठी वसुली प्रमाणपत्र मिळण्यासाठी बँकेने प्रकरण दाखल केले आहे. सदर कर्जदार व जामीनदार तसेच हमीदार यांना या कार्यालयाने सुनावणीस उपस्थित राहण्यासाठी रजिस्टर पोस्टाने नोटीसा पाठवल्या आहेत. परंतु ते त्यांनी दिलेल्या पत्त्यावर राहत नसल्यामुळे नोटीस घेण्यास इन्कार नोटीसा परत आल्या आहेत. तसेच काही प्रकरणात नोटीसा प्राप्त होऊनही सुनावणीस हजर राहिले नाहीत.

करिता या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की सदर वसुली प्रमाणपत्र देण्यापूर्वी आपले म्हणणे मांडण्यासाठी श्री आर. एम. मोटे अवसायक चंपावती अर्बन को ऑफ बँक लि. बीड तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका शिरूर (का) यांच्या समोर दिनांक १७ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक अकरा वाजता चंपावती अर्बन को-ऑप बँक लि बीड सोनाजीराव शिरसागर कॉम्प्लेक्स जुना मोंढा बीड येथे प्रत्यक्ष उपस्थित राहून आपले लेखी/तोंडी म्हणणे मांडण्यात यावे. सदर तारखेस आपण हजर राहून आपले म्हणणे मांडले नाही तर आपले काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून एकतर्फी निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | कर्जदार व जामिनदाराचे नावं | पत्ता | येणे थकबाकी |
|---|---|---|---|
| १. | कर्जदार : धांडे महादेव केशवराव जामीनदार १. धांडे नागनाथ भगवान, २. भोसले सुंदर बलभीम | गणेश नगर जुने एस.पी. ऑफिसच्या बाजुला, बीड धांडे गल्ली तेरवी लाईन बीड -//- | १,३१,७०, ०५६ |
| २. | कर्जदार : दांगट सतीष राधाकृष्ण जामीनदारः १.जामकर राधाकिसन चिंतामण २.नाईकवाडे गणेश भीमराव | आदर्शनगर नगर रोड बीड मु.पो. वडगाव (गुंधा) ता.जि.बीड काशीनाथ गिरामनगर करपरा नदी जवळ बीड | ८१, ५८,६०३ |
| ३. | कर्जदार १. राऊत शारदा गणेश २.राऊत मिनेश बळीराम जामीनदारः १.राऊत शिवाजी कोंडीबा, २.काळे श्रीराम गणपती | मु.पो. नाळवंडी ता.जि. बीड -//- -//- -//- | ५,६६,६३,४६७ |
| ४. | कर्जदार: तुपे अजिनाथ आंबू जामीनदारः १. जोगदंड गणेश निवृत्ती २. गोरे भागुजी हरिभाऊ हमीदार मुख्याध्यापक | संत नामदेव नगर धानोरा रोड बीड मुं. बाभळगाव पो. चौसाळा ता.जि.बीड मु. द.शहजानपुर पो. कामखेडा ता.जि. बीड जि.प. केंद्रीय प्रा. शाळा वडगांव (गुंधा) | १०,३८,५७८० |
| ५. | कर्जदार: रांजवण मीरा माणिक (मयत), मयताचे वारसदार, जामीनदार : १. रांजवण माणीक रावसाहेब, २. काकडे सखुबाई आनंतराव, हमीदार : मुख्याध्यापक | झेंडा चौक माजलगांव ता. माजलगावं जि. बीड -//- रमा अपार्टमंट ऑफीसर कॉलनी नगर रोड बीड जि.प. माध्यमिक शाळा पात्रुड,ता. माजलगाव | २०,७९,८१९ |

(स्वाक्षरीत)
श्री आर. एम. मोटे
अवसायक
चंपावती अर्बन को ऑफ बँक लि. बीड
तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था तालुका शिरूर (का) जि. बीड


## फॅन्सी ड्रेस व विविध गुण दाखवून दिला सरत्या वर्षला निरोप

### राजिप ग्रामीण उत्कृष्ट शाळा वडगावचा अभिनव उपक्रम

**रायगड । प्रतिनिधी**

सन २०२४ च्या सरत्या संध्येस वडगाव शाळेच्या विद्यार्थ्यांनी फॅन्सी ड्रेस व विविध गुणदर्शन दाखवत दिला निरोप व आनंददायी पद्धतीने नवं वर्षाचे स्वागत केले.मुलांनी विविध वेशभूषा करून, दिवसाची सुरुवात केली. मुलांनी वाघ, शिकारी, सावित्रीबाई फुले, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, पंडित जवाहरलाल नेहरू, मनमोहन सिंग, कोळी, आदिवासी, भूत अशा विविध वेशभूषेतील विद्यार्थी दिवसभर शाळेत दिसत होते.पालक व गावासाठी ही वेगळीच पर्वणी होती.मुख्याध्यापक सुभाष राठोड यांच्या या अफलातून कल्पनेचे पालकवर्गातून स्वागत होत आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी विविध नृत्य सादर करत वातावरण आनंदी केले. छोटी नाट्य, पथनाट्य सादर करून शैक्षणिक व सामाजिक संदेश दिले.सरत्या वर्षाला अनोख्या पद्धतीने निरोप देणारी वडगाव शाळा आज परिसरातील कुतूहलाचा विषय आहे.या कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती च्या अध्यक्षा, उपाध्यक्ष व सदस्य उपस्थित होते.त्याचबरोबर शिक्षक वैजनाथ जाधव, मयुरी धायगुडे, स्वयंसेविका व पालक मोठ्यासंख्येने उपस्थित होते.




## जाहीर प्रगटन

### तहसिलदार, बीड यांचे न्यायालयात

**जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण अर्ज नं. २७४/२०२४**
**सावित्राबाई भ्र. तुकाराम खामकर विरुद्ध ग्रा.पं. वडगाव (क)**

पहा
१. सावित्राबाई भ्र. तुकाराम खामकर
रा. वडगाव (कळसंबर) ता. जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म-मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून मयत पंढरीनाथ बयाजी मोरे यांचा दिनांक १५/०५/१९६८ रोजी मृत्यू झालेला असून त्यांचे मृत्यूची नोंद जन्म-मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास मृत्यु यांच्या नोंद ग्रामपंचायत कार्यालय/न.प. कार्यालयास वडगाव (क) ता. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर हया जाहिरनाम्याच्या तारखेपासुन एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मृत्यु नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे ४५रगाव (३.) ता. जि. बीड येथील जन्म मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन मृत्यु प्रमणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २६/१२/२०२४ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

सदर प्रकरणात पुढील तारीख २६/०१ /२०२४ ही आहे.

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
तहसिलदार
बीड,

शिक्का


## वखार महामंडळाने शेतमाल साठवणूक क्षमता वाढवावी: पणन मंत्री जयकुमार रावल



**मुंबई । प्रतिनिधी**

वखार महामंडळ साठवणूक केलेल्या शेतमालाचा विमा उतरवून शेतकऱ्यांना साठवणूक भाड्यामध्ये सवलत देते. ही सुविधा निश्चितच शेतकऱ्यांच्या लाभाची आहे. शेतकरी हिताच्या सुविधा देणाऱ्या वखार महामंडळाने गोदामांचा विस्तार करून साठवणूक क्षमतेत वाढ करण्याचे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशन व महाराष्ट्र कापूस उत्पादक पणन महासंघाच्या बैठकीमध्ये श्री. रावल आढावा घेताना बोलत होते.

बैठकीस महाराष्ट्र कापूस उत्पादक पणन महासंघाचे क्षेत्रीय प्रबंधक आप्पासाहेब धुळाज, महाराष्ट्र राज्य मार्केटिंग फेडरेशनचे व्यवस्थापकीय संचालक श्रीधर डूबे पाटील, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक कौस्तुभ दिवेगावकर, सह व्यवस्थापकीय संचालक दीपक शिंदे, व्यवस्थापकीय संचालक प्रशांत बारगावकर उपस्थित होते. सध्या अस्तित्वात असलेल्या वखार महामंडळाच्या गोदामांच्या दुरुस्तीचा कार्यक्रम राज्यभर राबविण्यात यावा. ज्या ठिकाणी गोदामांमध्ये शीतगृहाची सुविधा उपलब्ध करून देणे शक्य आहे, तिथे देण्यात यावी. राज्यात होत असलेल्या ड्राय पोर्टमध्ये प्राधान्याने गोदामांची निर्मिती करावी. शेतमालाच्या उत्पादकतेनुसार विशिष्ट शेतमाल साठवण्यासाठी 'सायलो' निर्मितीवर भर देण्यात यावा. रेल्वे मार्गाजवळ मालवाहतुकीच्या दृष्टिकोनातून गोदामांची निर्मिती करावी, अशाही सूचनाही श्री. रावल यांनी दिल्या.

# संतोष देशमुखांच्या हत्या प्रकरणात थेट वाल्मिक कराडचं नाव

**बीड । प्रतिनिधी**

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी पहिल्यांदाच वाल्मिक कराड याच्यावर संशय व्यक्त केला आहे. आतापर्यंत केवळ खंडणी प्रकरणी वाल्मिक कराड याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता. मात्र, काल (३१ डिसेंबर) कराडला कोर्टात हजर केल्यानंतर सीआयडीने मात्र, खंडणी आणि संतोष देशमुख यांची हत्या या प्रकरणाचा संबंध असू शकतो असा युक्तिवाद करत कोर्टाकडे कराडच्या १५ दिवसांच्या कोठडीची मागणी केली.

ज्याला कोर्टानेही मान्यता दिली. हत्येचा मुख्य आरोपी सुदर्शन घुले हा फरार आहे त्यामुळे वाल्मिक कराड याची कोठडी महत्त्वाची आहे. कराड याची कोठडी मिळाल्याशिवाय सुदर्शन घुले याचा शोध घेणे हे कठीण व अवघड होईल. हत्या आणि खंडणीच्या गुन्ह्यात कराडचा सहभाग आहे हे तपासायचे



आहे.' असा युक्तिवाद सरकारी वकिलांकडून करण्यात आला.

आतापर्यंत केवळ खंडणी प्रकरणातच वाल्मिक कराड यांचं नाव घेतलं जात होतं. पण पहिल्यांदाच त्याचं नाव हत्या प्रकरणात अधिकृतरित्या घेण्यात आल्याने आता त्याच्या अडचणीत वाढ झाली आहे.

वाल्मिक कराडच्या खंडणी केस प्रकरणातील वकील बदलण्यात आला आहे. सरकारी वकील म्हणून नेमणूक करण्यात आलेल्या एस. एस. देशपांडे यांनी अचानक आपण ही केस लढविण्यास तयार नसल्याचं सांगितलं.

### वाल्मिक कराडच्या वकिलांनी काय केला युक्तिवाद ?

**राजकीय द्वेषापोटी हत्या प्रकरणात नाव गवण्यात आल्याचे युक्तिवाद वाल्मिक कराडचे वकील अशोक कवडे यांनी कोर्टासमोर केला. वाल्मिक कराड याच्यावर फक्त दोन कोटींची खंडणी मागितलेला आरोप आहे. आवाजाचे नमुने देण्यास तयार. पण त्यासाठी कोठडी देण्याची गरज नाही. आरोपी कराडला पंधरा दिवसांची पोलीस कोठडी मागणं हे चुकीचं. असाही वकिलांनी युक्तिवाद केला. वाल्मिक कराड हे शरण आले आहेत. तसेच खंडणी मागितल्याचा फक्त आरोप झाला आहे. त्यामुळे त्यांना न्यायालयीन कोठडी द्या. कराड हा सामाजिक कार्यकर्ता आहे. तसेच तो गरीब राजकारणी आहे. असा देखील वाल्मिक कराडच्या वकिलांनी युक्तिवाद यावेळी केला.**

त्याबाबत त्यांनी कोर्टाकडे पत्रही दिलं. वैयक्तिक कारणास्तव त्यांनी ही केस लढण्यास नकार दिला आणि अन्य वकील नेमावा असं पत्रात म्हटलं. त्यानंतर जे. बी. शिंदे यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यात आली.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडवर सीआयडीचा संशय हत्येचा मुख्य आरोपी सुदर्शन घुले हा फरार आहे त्यामुळे वाल्मिक कराड याची कोठडी महत्त्वाची आहे. कराड याची कोठडी मिळाल्याशिवाय सुदर्शन घुले याचा शोध घेणे हे कठीण व अवघड होईल. हत्या आणि खंडणीच्या गुन्ह्यात कराडचा सहभाग आहे हे तपासायचे आहे त्यासाठी त्याची कोठडी मिळणं हे गरजेचं आहे. असा जोरदार युक्तिवाद सरकारी वकील जे. बी. शिंदे यांनी सीआयडीच्या वतीने केला. तसेच मोबाइलवरील संभाषण हे कराड याचंच आहे का याची देखील तपासणी करायची आहे. त्यामुळे तपासासाठी सीआयडीला कराडची पंधरा दिवसांची पोलीस कोठडी मिळावी. अशी मागणी यावेळी करण्यात आली.

संतोष देशमुख यांच्या हत्येत वाल्मिक कराडचा हात आहे का? हे देखील तपासायचं आहे असे देखील सीआयडीने म्हटले आहे. हत्या आणि खंडणीचं कनेक्शन म्हणून कराडची कोठडी ही गरजेची आहे. असा मोठा युक्तिवाद सरकारी वकिलांनी केला आहे. दोन्ही गुन्हे संबंधित असल्याने तपास करायचा आहे आणि तपास महत्त्वाचा असल्याचे आहे. खुनाच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी सुदर्शन घुले हा वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून काम करायचा. सध्या सुदर्शन घुले आणि आणखी काही फरार आरोपी आहेत त्यांचा देखील शोध बाकी आहे. असं म्हणत सरकारी वकिलांनी सीआयडीच्या वतीने वाल्मिक कराडवर खळबजनक आरोप केले आहेत.

# बीड पंचायत समितीचा कारभार ढेपाळला

**बीड । प्रतिनिधी**

पंचायत समिती अंतर्गत व्यक्तिगत लाभाच्या योजना मोठ्या प्रमाणात राबविल्या जातात. ज्यामध्ये घरकुल, शेतीसंबंधी फळबाग, विहीर, गायगोठा यांचा समावेश असून गावच्या सार्वजनिक अन् व्यक्तिगत गावकऱ्यांच्या विकासासाठी या योजना महत्वाच्या असतात. गेल्या काही दिवसांपासून बीड पंचायत समिती अंतर्गत वैयक्तिक व सार्वजनिक लाभाच्या योजनांच्या मागण्या व इतर बाबतीत कसलीच कार्यतत्परता दाखवली जात नाही..

सामाजिक अंकेक्षणच्या नावाखाली अख्ख्या तालुक्यातील सगळेच मंडळ निहाय कामे बंद ठेवणे हिताचे नसून ढेपाळलेला कारभार सुरळीत व्हावा, रोहयो अंतर्गत व्यक्तिगत लाभाच्या योजनांच्या मागण्या, कुशल बाबत कार्यवाही व्हावी. या योजनांच्या माध्यमातून आर्थिक विकास, गरीब हटाव, स्वच्छ अन् हरित गाव, पोषणयुक्त गाव यासारख्या गोष्टी साध्य होतात, मात्र योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या



संस्थेचा कारभार ढेपळलेल्या अवस्थेत असेल तर कसा सर्वांगीण विकास होणार? कर्मचारी वेळेवर उपलब्ध नसणे हा महत्वाचा प्रश्न असून पूर्णवेळ गटविकास अधिकारी मिळत नाही. यासाठी तालुक्यातील विविध गावच्या सरपंच, उपसरपंच, ग्रां प सदस्य, शेतकरी, लाभार्थी यांना आज दिनांक २ जानेवारी २०२५ रोजी सोबत घेत जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट घेत समस्या मांडणार असल्याचं सर्वपक्षीय सरपंच, उपसरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष धनंजय गुंदेकर यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे म्हंटले आहे.

# गेवराईत चोरट्यांचा धुमाकूळ, नववर्षाच्या रात्री घर फोडले

## मोटारसायकलसह वीस हजाराचा ऐवज लंपास, दोन ठिकाणी चोरीचा प्रयत्न फसला



**गेवराई । प्रतिनिधी**

नववर्षाच्या रात्री गेवराईतील ताकडगाव रोडवर चोरट्यांनी धुमाकूळ घातला. यावेळी एका घराचे गेटचे कुलूप तोडून पोर्चमधील मोटारसायकल पळविली. तसेच एका घरात कोणीच नसल्याचा फायदा घेत घराचे कुलूप तोडून आतमधील काही नगदी रकमेसह २० हजारांचा ऐवज पळवला. तसेच इतर दोन ठिकाणी मोटारसायकलचे लाँक तोडत असतानाच घरातील नागरिकांना जाग आल्याने आरडाओरड होताच चोरट्यांनी सदरील ठिकाणाहून धुम ठोकली. त्यामुळे या दोन ठिकाणी चोरीचा प्रयत्न फसला असला तरी नवीन वर्षाच्या रात्रीच चोरट्यांनी पोलिसांसमोर आव्हान उभे करत नागरिकांच्या झोपा उडवल्या. दरम्यान या चोरीच्या घटनेप्रकरणी गेवराई पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करत कपाटातील काही रोख रक्कम व काही बेंटेक्स दागिने, नवीन काही साड्या, देव घरातील देवाच्या मुर्ती असा जवळपास २० हजारांचा ऐवज चोरुन बाजूलाच असलेल्या राज राठोड यांच्या घरासमोरील मोटारसायकल चोरण्याच्या प्रयत्नात चोरटे असतानाच त्याठिकाणी राज राठोड यांना जाग आल्याने त्यांनी आरडाओरड केली. त्यामुळे याठिकाणाहून चोरट्यांनी धुम ठोकली. यानंतर पोलिसांना माहिती मिळताच पेट्रोलिंगची गाडी याठिकाणी आली होती. याप्रकरणी अशोकराव गोंडे यांच्या तक्रारीवरून गेवराई पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान चोरट्यांनी नववर्षाच्या सुरुवातीलाच चोरीच्या घटनेची सलामी दिल्याने नागरिक भयभीत झाले असून पोलिसांसमोर पुन्हा एकदा आव्हान उभे केले आहे.



*माहिती अधिकारी अंजू कांबळे- निमसरकर यांची दिल्ली येथील कार्यालयात सेवावर्ग झाल्यामूळे त्यानां जिल्हा माहिती कार्यालयातील कर्मचा-यांच्या वतीने निरोप देण्यात आला.*

# खामगाव येथे 3 जानेवारी रोजी महिला शेतकरी मेळाव्याचे आयोजन

**गेवराई । प्रतिनिधी**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र खामगाव येथे दिनांक ०३ जानेवारी रोजी सकाळी १०.०० वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विस्तार शिक्षण संचालनालय वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी, कृषि विज्ञान केंद्र खामगाव, कृषी विभाग, आत्मा बीड, महिला आर्थिक विकास महामंडळ , उमेद, इफको व धान फाउंडेशन, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठस्तरीय शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनामकृवी परभणीचे मा. कुलगुरू प्रा (डॉ) इन्द्र मणि हे असणार आहेत, तर सदर मेळाव्याचे उद्घाटन मा. श्री. अविनाश पाठक (भा.प्र.से) जिल्हाधिकारी बीड यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री. आदित्य जीवने (भाप्रसे) मुख्य कार्यकारी अधिकारी जि प बीड , मा. डॉ आदिती सारडा कार्यकारी परिषद सदस्य, वनामकृवी परभणी, मा. डॉ. गिरधारी वाघमारे, संचालक विस्तार शिक्षण वनामकृवी, परभणी आणि मा. डॉ. तुकाराम मोटे विभागीय कृषि सहसंचालक, छत्रपती संभाजीनगर हे असणार आहेत तर मा. सौ. संगीतादेवी पाटील, प्रकल्प संचालक, डॉ. जया बंगाळे सहयोगी अधिष्ठाता व प्राचार्य व श्री सयप्पा गरंडे कृषि विकास अधिकारी बीड यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सौ सिताबाई मोहिते जिजामाता कृषि भूषण पुरस्कार प्राप्त, रामनगर, जालना व डॉ नीता गायकवाड, केंद्र समन्वयक तथा वरिष्ठ शास्त्रज्ञ, अ.भा. स. सं.प्र कृषीरत महिला , वनामकृवी परभणीचे मार्गदर्शन होणार आहे. तरी या मेळाव्याचा जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन विस्तार शिक्षण संचालनालय,कृषि विभाग, आत्मा, महिला आर्थीक विकास महामंडळ, उमेद, धान फौंडेशन, इफको, बीड व केव्हीके खाम गाव यांनी केले आहे.

# नववर्षाच्या पूर्वसंध्येला बीड तालुक्यातील ए पी एल शिधापत्रिकाधारक शेतकरी कुटुंबाच्या खात्यात दोन कोटी एक्केचाळीस रुपये जमा

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यात प्राधान्य कुटुंब योजनेचे ६३४८७ , अंत्योदय योजनेचे ७३८४ , ए पी एल योजनेचे शेतकरी १९०६६ , एन पी एच योजनेचे ९२७७ , शुभ्र शिधापत्रिका धारक १५६८ असे एकुण १००७८२ शिधापत्रिकाधारक आहेत . तालुक्यात एकुण ३४८ स्वस्त धान्य दुकाने आहेत . १९०६६ ए पी एल शेतकऱ्यापैकी ५८०० शिधापत्रिकाधारक यांना एपीएल डीबीटी द्वारे रोख रक्कम प्राप्त झाली असून त्यापैकी ३७८२ लाभार्थी यांच्या खात्यात प्रतिव्यक्ती १७० प्रमाणे २ कोटी ४१ लाख ४१०६१ रुपये महिला कुटुंब प्रमुख यांच्या खात्यात नवीन वर्षाच्या पूर्व संध्येला जमा झाले आहेत . उर्वरित २०१८ शेतकरी लाभार्थी



यांनी बँक खाते केवायसी न केल्याने खात्यात रक्कम जमा झालेली नाही . तरी त्यांनी बँक खाती केवायसी करून घ्यावीत , असे आवाहन तहसीलदार चंद्रकांत शेळके पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर यांनी केले आहे . तसेच ज्या एपीएल शिधापत्रिकाधारक शेतकरी यांनी तहसील कार्यालयात फार्म भरुन दिलेला नाही त्या शिधापत्रिका धारक यांनी आपल्या कुटुंबातील महिलेचे बँक पासबुक , आधार कार्ड व कुटुंबातील कोणत्याही व्यक्तीचा सातबारा तहसील कार्यालयात जमा करावा असे आवाहन अव्वल कारकून श्री संतोष मुळीक यांनी केले आहे .

तहसीलदार चंद्रकांत शेळके हे ऑगस्ट महिन्यात बीड तहसीलदार पदावर रुजू झाले . तेव्हापासून त्यांनी तालुक्यातील मंडळाच्या ठिकाणी बैठका घेण्याचा धडाका सुरू केला . या बैठकांना स्वस्त धान्य दुकानदार यांनाही बोलावण्यात आले . या बैठकीस सर्वसामान्य शेतकरी , नागरिक , स्वस्त धान्य दुकानदार समोरासमोर असल्याने त्यांच्या समस्यांचे समाधान तात्काळ होण्यास सुरुवात झाली . स्वस्त धान्य दुकानासंदर्भात काही तक्रारी असल्यास त्यांचे निराकरण करण्यासाठी पुरवठा निरीक्षण अधिकारी प्रशांत सुपेकर हे सुद्धा वेळोवेळी भेटी देतात . सध्या पी एच एच व अंत्योदय शिधापत्रिका धारक यांची ईकेवायसी स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत करणे सुरू असून लहान मुले व वयस्कर कुटुंब प्रमुख यांची केवायसी सध्या होणार नसून कुटुंबातील इतर व्यक्ती यांनी केवायसी साठी स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडे जाऊन ekyc करावी.

# बालकीर्तनकार सोहम महाराज सातपुते यांचे किर्तन

**बीड । प्रतिनिधी**



येथील विठ्ठल मंदिर नवजीवन शिक्षक कॉलनी बीड येथे दि.२८ /१२/२४ शनिवार पासून शिवपुराण कथा व भव्य कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे या कीर्तन महोत्सवांमध्ये शिवपुराण कथा व नामवंत महाराज मंडळींची कीर्तन सेवा संपन्न होत आहे या निमित्ताने दि २ जानेवारी गुरुवारी रात्री ८ ते १० या वेळेत बालकीर्तनकार ह.भ.प.सोहम महाराज सातपुते यांचे हरिकिर्तन होणार आहे. तरी या कीर्तनाचा सर्व भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक यांनी केले आहे..

# गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावात भाजपाचे सदस्य नोंदणी अभियान राबविणार : माजी जि. प. सदस्य सुरेश हात्ते



**तलवाडा । प्रतिनिधी**

पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावात व वाडी - वस्ती - तांडयावर जावून भाजपचे सदस्य नोंदणी अभियान राबविणार असल्याचे माजी जि.प.सदस्य तथा भाजपचे नेते मा श्री सुरेश हात्ते यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे. देशासह महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहचलेला भाजप हा पक्ष असून भविष्यात पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी कार्यकर्त्यांनी देखील जोमाने कामाला लागले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. येणाऱ्या काळात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकांमध्ये पक्षाला घवघवीत यश मिळवून देण्यासाठी तसेच पक्षाचे संघटन वाढविण्यासाठी आपण स्वतः गेवराई तालुक्यातील प्रत्येक गावात जाऊन भाजपचे सदस्य नोंदणी अभियान राबविणार आहोत असे देखील त्यांनी म्हटले आहे. भाजपच्या सर्व कार्यकर्त्यांनी एकमेकांना विश्वासात घेऊन सदस्य नोंदणी अभियान यशस्वी करण्यासाठी एकदिलाने काम करावे असे आवाहन माजी जिल्हा परिषद सदस्य माननीय श्री सुरेश हात्ते यांनी केले आहे.

# महाराणी ताराबाई विद्यालयात उद्योजक रणजीत धस यांनी परदेश दौरा केल्याबद्दल सत्कार

## कर्तव्यांच पालन केल्यास आपला देश प्रगती करु शकता: रणजीत धस

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी शहरातील आशीर्वाद ट्रेडर्सचे सर्वेसर्वा ओनर तथा वडवणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे युवा संचालक रणजीत मधुकरराव धस यांनी नुकताच थायलंड या देशाचा दौरा करून आल्याबद्दल महाराणी ताराबाई विद्यालयात त्यांच्या सत्काराचा कार्यक्रम संपन्न.

याबाबत अधिक माहिती अशी की, युवा उद्योजक रणजीत भैय्या धस यांनी दि.१६ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०२४ या दरम्यान ब्रिटिश पेंट कंपनीच्या वतीने परदेश दौऱ्यासाठी फुकेट थायलंड या देशासाठी निवड झाली होती तेथील पर्यटन स्थळांना भेटीदेत मायदेशी परतले आहेत त्यांचे



परदेशातील अनुभव विद्यार्थ्यांना माहिती व्हावेत यासाठी दि.३१ डिसेंबर २०२४ मंगळवार रोजी त्यांच्या सत्काराचा कार्यक्रमाचे आयोजन महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयमध्ये करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून संस्थेचे संचालक इंजि.अशोक आंधळे तसेच सत्कारमूर्ती युवा उद्योजक रणजीत भैय्या धस, विद्यालयाचे प्राचार्य राऊत सर, उपप्राचार्य मस्के सर,पर्यवेक्षक धाईतिडक सर आदी मान्यवर म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी इंजि.अशोक भैय्या आंधळे यांनी अभिनंदन व शुभेच्छापर विचार व्यक्त करताना ते म्हणाले की,व्यवसायाच्या माध्यमातून २० परदेशी दौऱ्या दरम्यान २४ देशांचा दौरा रणजीत भैय्या यांनी केलेला आहे त्यामध्ये ७ वेळा आपल्या आई-वडिलांना परदेश दौऱ्यावर घेऊन गेले आहेत विद्यार्थी मित्रांनो आपण सुद्धा,मेहनत,जिद्द,चिकाटीच्या जोरावर शिक्षणामध्ये यशस्वी व्हावे असे विचार व्यक्त करून परदेश दौरा पूर्ण केल्याबद्दल रणजीत भैय्या यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या हस्ते गुलाल,शाल आणि पुष्पगुच्छ देऊन युवा उद्योजक रणजीत भैय्या यांचा सत्कार शिक्षक शिक्षिका यांच्या उपस्थितीत करण्यात आला.

# '100 दिवसांचे लक्ष्य अंतर्गत' विशेष मोहिमेचे आयोजन

## जाती दावा त्रुटी पडताळणीसाठी प्रस्ताव सादर करावे

**बीड । प्रतिनिधी**

कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती बीड मार्फत '१०० दिवसांचे लक्ष्य अंतर्गत' विद्यार्थ्यांना त्रुटी पुर्ततेसाठी व तयार असलेले जात वैधता प्रमाणपत्र समिती स्तरावरून निर्गमित करण्यासाठी विशेष मोहीम आयोजित करण्यात आलेली आहे सन २०२४-२५ मध्ये इयत्ता ११ वी १२ विज्ञान व व्यावसायिक पाठ्यक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी बीड समितीच्या कार्यक्षेत्रातील ज्यांचे जातीचे प्रमाणपत्र पडताळणी होऊन जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यासाठी समितीकडे अर्ज दाखल केलेले आहेत. अशा सर्व जाती दावा प्रकरणांमध्ये समिती स्तरावर प्राथमिक छाननी करून ज्या प्रकरणांमध्ये कागदपत्रे पुराव्या अभावी त्रृटी आढळून आलेली आहे, अशा प्रकरणांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांनी दिलेल्या जाती दावा प्रस्तावामध्ये नमूद केलेल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे अथवा लेखी पत्रान्वये त्रुटी असल्याचे कळविण्यात आलेले असून शैक्षणिक, सेवा, निवडणूक व इतर कारणासाठी जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रस्ताव कार्यालयात प्रलंबित आहेत.

